विभाग प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ यांच्या सर्वसाधारण बदल्या-२०१७.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : बदली-४३१७/प्र.क्र.६४/१७/तांशि-७**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २०१७

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या सेवेतील विभाग प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था या संवर्गातील सर्वसाधारण बदल्या व नियम ४(४) नुसार केलेल्या बदल्या खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शासकीय अधिका-याचे नाव | कार्यरत संस्था | बदलीनंतरची पदस्थापना | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी** | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. एकनाथ महादू चौधरी | शा.तं.नि. गडचिरोली | शा.तं.नि. मुंबई | प्रशासकीय बदली |
| २ | श्री. उमेश तेनिप्रसाद नागदेवे | शा.तं.नि. औरंगाबाद | उप सचिव (तां) या पदावर म.रा.तं.शि. मंडळ, मुंबई. | विनंती बदली |
| **विभाग प्रमुख, विद्युत अभियांत्रिकी** | | | | |
| १ | श्री. संदीप बाळकृष्ण विश्वरुपे | शा.तं.नि. विक्रमगड | शा.तं.नि. मुंबई | विनंती बदली |
| **विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी** | | | | |
| १ | श्री. गजानन विश्वनाथ उमाळे | शा.तं.नि. औरंगाबाद | शा.तं.नि. खामगांव | विनंती बदली |
| २ | श्री. राजेंद्र पंढरीनाथ बऱ्हाटे | शा.तं.नि. मुंबई | शा.तं.नि. बीड | प्रशासकीय बदली |
| ३ | श्री. विजय दत्तात्रय वैद्य | म.रा.तं.शि. मंडळ मुंबई | शा.तं.नि. कोल्हापूर | प्रशासकीय बदली |
| **विभाग प्रमुख, यंत्र अभियांत्रिकी** | | | | |
| १ | डॉ. अजय वसंतराव पेशवे | शा.तं.नि. औरंगाबाद | शा.तं.नि. विक्रमगड | प्रशासकीय बदली |
| २ | श्री. प्रमोद उत्तम वायसे (उपसचिव) | म.रा.तं.शि. मंडळ वि.का. औरंगाबाद | शा.तं.नि. कोल्हापूर | प्रशासकीय बदली |
| ३ | श्री. आनंदसिंग नरसिंगराव पवार | शा.तं.नि. नांदेड | म.रा.तं.शि. मंडळ वि.का. औरंगाबाद येथे उपसचिव (तां.) या पदावर | विनंती बदली |
| **विभाग प्रमुख, उपयोजित यंत्रशास्त्र** | | | | |
| १ | श्री. योगेश कांतीलाल चंदाराणा | शा.तं.नि. नागपूर | म. रा.तं.शि. मंडळ मुंबई येथे उपसचिव (तां.) या पदावर | प्रशासकीय बदली |

सहसंचालक, तंत्रशिक्षण
आवक 4790
दिनांक 1 JUN 2017

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | श्री. शिवाजी तुळशीराम बिडगर | शा.तं.नि. उस्मानाबाद | शा.तं.नि. कराड | प्रशासकीय बदली |
| **विभाग प्रमुख, उपकरणीकरण** | | | | |
| १ | बाळासाहेब मारुती कर्डीले | शा.तं.नि. अहमदनगर | उप सचिव (तां) या पदावर म.रा.तं.शि. मंडळ, मुंबई | प्रशासकीय बदली |
| **विभाग प्रमुख, माहिती तंत्रज्ञान** | | | | |
| १ | श्री. जितेंद्र रामदासजी निखाडे | शा.तं.नि. ठाणे | सहाय्यक संचालक (तां), तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई. | प्रशासकीय बदली |

०२. प्रशासकीय कारणास्तव बदली झालेल्या विभाग प्रमुखांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. विनंती बदली असलेल्या विभाग प्रमुखांना पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

०३. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील तरतुदींनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने सदर बदल्या करण्यात येत आहेत.

०४. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) आदेश तात्काळ अंमलात येतील.
२) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभाग प्रमुखांनी सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतून तात्काळ त्यांची बदली नंतरची पदस्थापना केलेल्या संस्थेत रुजु व्हावे. तसेच सर्व संस्थाप्रमुखांनी पर्यायी विभाग प्रमुख हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या विभागप्रमुखांना तात्काळ कार्यमुक्त करावे.
३) बदली झालेले विभाग प्रमुख त्यांच्या संबंधित संस्थेकडून कार्यमुक्त होऊन रुजु होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजु करुन घ्यावे. एखाद्या विभागप्रमुखास रुजु करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरुन काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल.
४) पदस्थापनेत बदल करण्यासंबंधीच्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
५) बदली झालेल्या विभाग प्रमुखांची कोणतीही रजा प्रशासकीय विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय मंजूर करण्यात येऊ नये.
६) सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व विभाग प्रमुखांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त **दि. ३० जून, २०१७** पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेने / आस्थापनेवर काढावे. त्यानंतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या संस्थेकडून / आस्थापनेकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित अधिकारी बदलीच्या संस्थेत रुजु झाल्यानंतर बदलीनंतरच्या संस्थेने/ आस्थापनेने काढावे. **दि.०१ जुलै, २०१७** पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील / आस्थापनेतील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

(७) बदली झालेल्या विभाग प्रमुखांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची जबाबदारी वैयक्तीकरित्या संबंधित संस्था प्रमुखांची राहील. याबाबतचा पाठपुरावा संबंधित विभागीय सहसंचालकांनी करावा, तसेच याबाबत कार्यपालन अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून ०२ महिन्यांत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी न चुकता या विभागास कळवावा.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०५३११६३३२०८७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e862e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd78160 02b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2017.05.31 17:14:51 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१७/ २१७६
दिनांकः- - 8 JUN 2017

प्रति,
**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/नांदेड/उस्मानाबाद
**उपसचिव**,महराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

यांना कळविण्यात येते की, विभाग प्रमुख,शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था,महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ यांच्या सर्वसाधारण बदल्या-२०१७ या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेतील ज्या विभाग प्रमुखांच्या बदल्या झाल्या असतील त्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे व तसा अहवाल या कार्यालयास अवगत करण्यात यावा.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.



Indorsment